# महाराष्ट्र शासन

व्यक्तीश:

क्र. केंमाअ-२०२१/मा.अ.प्र.क्र.४१/का.१२
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०००३२.
दि.०९/०२/२०२१.
ई-मेल : desk१२.gad@maharashtra.gov.in

प्रति,
श्री. राजू तुकाराम पार्टे
मु. भैरवनाथनगर, पो.ता.पोलादपूर,
जि. रायगड.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज.
संदर्भ :- आपला दिनांक ०४.०२.२०२१ चा माहितीचा अर्ज.

महोदय,

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत उपरोक्त विषयाबाबतचा आपला संदर्भाधिन माहितीचा अर्ज दि.०८.०२.२०२१ रोजी या कार्यासनात प्राप्त झाला आहे.

२. आपल्या माहिती अर्जान्वये आपण विचारणा केलेल्या माहितीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

| अ.क्र. | आपण विचारणा केलेली माहिती | कार्यासन १२ चे अभिप्राय |
|---|---|---|
| १ | सन २००१ पासून शासकीय सेवेत असताना सन २००५ नंतर तिसरे अपत्य झाल्याने शासन अधिसूचना २८ मार्च, २००५ मधील तरतूदीनुसार सेवेतून अनर्ह ठरवून कमी करण्याकरीता सदर अधिसूचना लागू होईल अगर कसे याबाबत आदेश/अधिसूचना/शासन निर्णय/शासन परिपत्रक इत्यादी सह त्यांच्या सत्य प्रतिसहित माहिती मिळावी. | दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत गट “अ” ते “ड” पदावर सरळसेवेने नियुक्ती देण्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ दिनांक २८.०३.२००५ च्या अधिसूचनेन्वये विहित केले आहेत. दि.२८.०३.२००५ च्या अगोदर शासन सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास सन २००५ नंतर तिसरे अपत्य झाल्यास, त्यांना सेवेतून अनर्ह ठरवून कमी करण्याकरिता सदर अधिसूचना लागू नाही. तसेच शासन सेवेत आल्यानंतर तिसरे अपत्य झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांविरुध्द काय कारवाई करावी, याबाबतचे या कार्यासनाचे सद्य:स्थितीत असे कोणतेच विशिष्ट शासन आदेश नाहीत. |

३. वरील उत्तराने समाधान न झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्रथम अपीलीय अधिकारी, श्रीम. गीता रा.कुलकर्णी, उप सचिव (सेवा), ५ वा मजला, खोली क्र.५४८, सामान्य प्रशासन विभाग, (दूरध्वनी क्र.२२८३६७२९) (email : geeta.kulkarni@nic.in),मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांच्याकडे ३० दिवसांत अपील करता येईल.

आपला,

(दि.ब.मोरे)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव